आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक ६० वा ● शनिवार दि. २३ ऑगस्ट २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य २६ ऑगस्ट रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर

लातूर (जिमाका): महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. डॉ. गोविंद काळे हे मंगळवार, २६ ऑगस्ट २०२५ रोजी लातूर जिल्ह्यात दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. प्रा. डॉ. काळे यांच्या उपस्थितीत २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे १ ऑगस्ट २०२४ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत ओबीसी, एसबीसी, व्ही.जे., एनटी., एसईबीसी, ईडब्ल्यूएस या संवर्गातील वितरीत केलेली जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे यांचा आढावा, तसेच भटक्या विमुक्त आश्रमशाळांबाबत आढावा बैठक होईल. दुपारी १२.३० वाजता त्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालय येथे लातूर जिल्हा भगीरथ गवंडी समाज या संघटनेचे व लोकप्रतिनिधींच्या निवेदनानुसार सगर/बेलदार जात समूहाचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधींशी चर्चा व सुनावणी होईल. दुपारी २ वाजता ते पुण्याकडे रवाना होतील.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे २ सप्टेंबर रोजी आयोजन

लातूर, (जिमाका): जिल्ह्यातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, प्रत्येकी महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते, तथापि माहे सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या सोमवारी म्हणजेच १ सप्टेंबर, २०२५ रोजी ज्येष्ठ गौरीपूजनाची सुट्टी असल्यामुळे सप्टेंबर, २०२५ मधील जिल्हास्तरीय लोकशाही दिन मंगळवार, २ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी १ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग २७ ऑगस्ट, १ सप्टेंबर रोजी राहणार बंद

लातूर, (जिमाका) : गणेश चतुर्थी असल्याने बुधवार, २७ ऑगस्ट, २०२५, तसेच सोमवार, १ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार ज्येष्ठागौरी पूजननिमित्त स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने या दोन्ही दिवशी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग बंद राहील. मात्र, रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी बाह्यरुग्ण विभाग सुरु राहील. तसेच मंगळवार, २ सप्टेंबर, २०२५ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे.

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर, (जिमाका) : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २३ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ६ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# घरफोडीच्या व साखर कारखान्यातील गन मेटल चोरी गुन्ह्यातील आरोपीला मुद्देमालासह अटक

## लातूर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

लातूर : लातूर जिल्ह्यात रात्रीच्या चोरीच्या घटना घडल्या होत्या. तसेच विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये जनावर चोरी, साखर कारखान्यातील गनमेटल च्या वस्तू चोरीच्याही घटना घडल्या होत्या. त्यावरून विविध पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात आरोपीता विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात होते.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी शेतकऱ्या च्या माला विरूद्ध होणारे गुन्हे कारखान्यातील चोरीचे गुन्हे उघडकिस आणण्याकरिता आदेशित केले होते .पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे दोन पथके तयार करून नमूद गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता.

गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना पथकाला रात्रीच्या वेळी चोरी करणाऱ्या, तसेच जनावर व साखर कारखान्यातील गनमेटल च्या वस्तू चोरी करणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून दिनांक २१ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता पथकांनी मुरुड येथील बायपास रस्त्यावरील रेल्वे स्टेशन चौक परिसरात सापळा लावून दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतल. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांने त्यांचे नाव १) रमेश उद्धव चव्हाण, वय २६ वर्ष, राहणार राजेश नगर ढोकी, जि. धाराशिव. २) शिवाजी लाला काळे, वय ४५ वर्ष, राहणार वाटवडा ता.जि.धाराशिव सध्या राहणार राजेश नगर ढोकी, जि.धाराशिव. असे असल्याचे सांगितले. त्याच्या कडे असलेल्या बॅगची तपासणी केली असता सदर बॅगमध्ये ०९ लाख २५ हजार रुपये रोख रक्कम मिळून आली. रकमेबाबत विश्र्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांच्या इतर साथीदारासह मिळून लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये रात्रीच्या वेळी घरात घुसून चोरी केली असून अनेक पोलीस ठाण्याच्या हद्दी मधून शेळ्या, म्हैस तसेच साखर कारखान्यातील गन मेटल च्या वस्तू चोरल्याचे कबूल केले. व रक्कम ही विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये जनावर व सोन्या-चांदीचे दागिने चोरून ते विकून




त्यामधून मिळवलेली असल्याचे कबूल केले.

पोलीस ठाणे किल्लारी, भादा व नांदेड जिल्ह्यातील बारड येथील साखर कारखान्यामधील गन मेटल च्या वस्तू त्यांच्या अन्य साथीदारासह मिळून चोरी करून ते भंगार दुकानदार ३) मुक्तार मौला पठाण, वय ४२ वर्ष, राहणार तुकाई नगर, मुरुड. याला तसेच आणखीन एक बार्शी येथील भंगार खरेदी दुकानदाराला विक्री केल्याचे सांगितले आहे. त्यावरून वर नमूद मुरुड येथील दुकानदारा कडून ०१ टन ०७ किलोग्रॅम इतक्या वजनाचे अंदाजे ०६ लाख ५७ हजार ४५६ रुपये किमतीचे भंगार जप्त करण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यातील घडलेल्या चोरीच्या गुन्ह्याच्या अभिलेखाचे पाहणी केली असता पोलीस ठाणे भादा हद्दीतील घरफोडी,जनावर चोरी, तसेच साखर कारखान्याच्या गन मेटल च्या वस्तू चोरीचे असे ०३ गुन्हे, पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण, कासारशिरशी येथील प्रत्येकी ०३ गुन्हे, पोलीस ठाणे चाकूर व देवणी येथील प्रत्येकी ०२ गुन्हे तर पोलीस ठाणे अहमदपूर, उदगीर शहर, निलंगा, किल्लारी व नांदेड जिल्ह्यातील बारड पोलीस ठाण्यातील प्रत्येकी ०१ असे एकूण १८ गुन्हे उघडकीस आले असून नमूद आरोपीकडून एकूण १५ लाख ८२ हजार ४५६ रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपींनी त्यांच्या अन्य १२ साथीदारासह वर नमूद पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये चोरी करून त्यात चोरलेला मुद्देमाल विकून मिळवलेली त्यांच्या हिश्याला आलेली रक्कम जप्त करण्यात आली आहे.

गुन्हेगार हे धाराशिव जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांना पुढील कार्यवाही करिता पोलीस ठाणे किल्लारी यांच्या ताब्यात देण्यात आले असून ते सध्या पोलीस कोठडीमध्ये आहे. त्याच्याकडून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून त्याच्या सोबतच्या साथीदारांचा तसेच भंगार खरेदी करणाऱ्यांचा दुकानदाराचा शोध पोलिस पथक घेत आहेत.

कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे,सफौ. सर्जेराव जगताप, पोलीस अमलदार माधव बिलापट्टे, रामलिंग शिंदे, नवनाथ हासबे, राजेश कंचे,प्रदीप स्वामी, तुराब पठाण, गणेश साठे, मोहन सुरवसे, रियाज सौदागर, युवराज गिरी, अर्जुनसिंग राजपूत, सिद्धेश्र्वर मदने, जमीर शेख, महादेव शिंदे, गोविंद भोसले, शैलेश सुळे, हरी पतंगे,व्यंकटेश निटुरे, प्रदीप चोपणे, श्रीनिवास जांभळे, महिला पोलीस अमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

## जनसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, : जनसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन विविध योजना, उपक्रम व अभियानांची अंमलबजावणी करीत असते. या सर्वांचे प्रभावी कार्यान्वयन करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांची आहे. यंत्रणांनी योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीतून जनसामान्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र कुठेही मागे पडणार नाही, याबाबत यंत्रणांनी सतर्क राहण्याचे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित बैठकीत सोशल सेक्टर (सामाजिक क्षेत्र) वॉररूम मधील योजनांचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. यावेळी तपशीलवार आढावा घेताना मुख्यमंत्री श्री फडणवीस बोलत होते. या बैठकीस महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

अमृत २.० अभियानाचा आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरी भागात पाणीपुरवठा, मलनिःसारण, हरित उद्याने व सरोवर पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्र शासनाकडून अमृत अभियानांतर्गत निधी देण्यात येत आहे. नागरी भागात जनसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून त्यांचे जीवन सुसह्य करण्याची क्षमता या अभियानात आहे. त्यामुळे यंत्रणांनी मिशन मोडवर या अभियानांतर्गत प्रलंबित असलेली सर्व कामे ३१ मार्च २०२६ पूर्वी पूर्ण करावीत. अभियानांतर्गत प्रलंबित असलेल्या प्रशासकीय मान्यता तातडीने देण्यात याव्यात. तसेच नियमानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेंकडून त्यांचा सहभाग उपलब्ध करुन द्यावा.

प्रकल्प पूर्णत्वातील विलंब टाळण्यासाठी प्रकल्प होऊ घातलेल्या जागेच्या परवानग्या प्राप्त करून घ्याव्यात. त्यानंतरच प्रकल्पाचे काम सुरू करण्यात यावे, असे निर्देश देत मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, विविध विभाग, यंत्रणांकडून काम सुरू करण्यासाठी संबंधित परवानगी आगाऊ स्वरूपात दिल्यास काम तातडीने सुरू होऊ शकते. टप्पानिहाय कामांमध्ये पाहिल्या टप्प्याचे काम सुरू करून पुढील टप्पा पूर्ण होईपर्यंत परवानगी प्राप्त करून घ्यावी. नागरी भागातील नागरिकांना दर्जेदार व आरोग्य सुविधा सहज उपलब्ध होण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ' हेल्थ अँड वेलनेस सेंटर' ची कामे पूर्ण करावीत.

आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण विभागाने वैद्यक क्षेत्रात उपलब्ध मनुष्यबळ आणि भविष्यात लागणारे मनुष्यबळाचा अभ्यास करावा. यामध्ये विशेषतः पॅरामेडिकलमध्ये लागणाऱ्या मनुष्यबळाचा विचार करावा. नर्सिंग महाविद्यालयांना परवानगी देताना तेथे पायाभूत सुविधा असल्याची खात्री करून घ्यावी. त्यानंतरच परवानगी देण्यात यावी. आरोग्य क्षेत्रात तातडीने मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी धोरण तयार करावे, असे निर्देशाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

प्रधानमंत्री मातृ वंदन योजना ही महिला व बालकल्याण विभागाकडे अंमलबजावणीसाठी हस्तांतरित करण्यात आली आहे. विभागाने मागील प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांचा आढावा घेऊन त्यांना लाभ देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सोयी सुविधा मिशन अंतर्गत राज्यात मंजूर असलेल्या विविध कामांसाठी ' नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोल' कडे प्रलंबित असलेल्या परवानग्या तातडीने प्राप्त करून घ्याव्यात. आपत्कालीन परिस्थितीत उपयोगात येणाऱ्या तात्पुरत्या रुग्णालयाची सुविधा असणारे ' भीष्म क्यूब' नियमितपणे देखरेखीखाली असावेत, अशा निर्देशही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी दिले.

## कु.धनश्री राऊत चि MBBS साठी निवड झालेबद्दल तिचा डावरे यांचेकडून सत्कार

माजलगाव (प्रतिनिधी) कु.धनश्री रविंद्र राऊत रा.कवडगाव बु.ता.वडवणी ह.मु.माजलगाव हि वैद्यकीय शिक्षणासाठी मेडिकल कॉलेज अंबाजोगाई येथे पात्र झाली आहे.कु.धनश्री राऊत MBBS शिक्षणक्रमांस अंबाजोगाई येथील महाविद्यालयात गुणवत्तेनुसार प्रवेशपात्र ठरली, ही निश्र्चितच अभिमानाची बाब आहे.



आतापर्यन्त कवडगाव(बु) ता.वडवणी येथील चार विद्यार्थी मेडिकलचे शिक्षण घेत आहेत.याच गावातील पोलीस खात्यात २०ते २२ युवक कार्यरत आहेत. आता ट्रॅक बदलून मुले वैद्यकीय शिक्षणकडे येत आहेत,ही आनंदाची बाब आहे. कु.धनश्री राऊतने अतिशय मेहनत जिद्द चिकाटीने स्वयं अध्ययनातून तिने हे यश मिळविले आहे.तिने दहावीपर्यंत मॉडेल इंग्लिश स्कुल,माजलगाव येथे शिक्षण पूर्ण केले तर बारावीचे शिक्षण लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे पुर्ण केले.हे यश मिळाल्याने तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच पुढील शिक्षणासाठी डावरे सर व आबासाहेब डावरे यांच्याकडून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.ती पत्रकार रविंद्र राऊत यांची मुलगी आहे.

## मोफत ब्यूटी पार्लर प्रशिक्षण केंद्रास, चेअरमन श्रीमती वैशालिताई विलासराव देशमुख यांची भेट

लातुर प्रतिनिधी:-विलासराव देशमुख फाऊंडेशन च्या वतीने बाभळगाव येथे सुरू करण्यात आलेल्यामोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी भेट दिली तसेच प्रशिक्षणार्थी महिला भगिणीसोबत संवाद साधला.

विलासराव देशमुख फाउंडेशनने महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.ट्वेंटीवन ग्रीच्या संचलिका सौ.अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील महीलांना स्वयंरोजगार आणि स्वावलंबनासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

या अंतर्गत बाभळगाव येथे विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या वतीने महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्राची सुरूवात करण्यात आली असून या केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालिताई विलासराव देशमुख यांनी दि.२२ ऑगस्ट (शुक्रवार) रोजी सदिच्छा भेट दिली आणि या ठिकाणी प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थी महिला भगिनीशी संवाद साधला व महिलांनी या प्रशिक्षणातून स्वतःच्या पायावर उभे रहावे व आपली आर्थिक प्रगती करून घ्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.




ग्रामीण व शहरी भागात महिलांसाठी रोजगाराच्या संधी कमी असतात,या पार्श्र्वभूमीवर विलासराव देशमुख फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे.या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांना पार्लर विषयीची प्राथमिक माहिती देऊन प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये वॅक्सिंग,विविध हेअर कट, मॅनिक्युअर,पेडक्युअर,थ्रेडिंग,मेकअप,फेशियल याविषयी प्रशिक्षण दिले जात आहे.महिला भगिनींनी या प्रशिक्षणाबद्दल विलासराव देशमुख फाऊंडेशनचे आभार मानले.

यावेळी फाऊंडेशन च्या समन्वक संगीता मोळवणे गावचे उपसरपंच गोविंद देशमुख, मा उपसरपंच अविनाश देशमुख,गावातील प्रमुख व्यक्ती, ट्रेनर शबाना शेख,गजानन बोयने,प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या.

# सत्तेच्या मर्जीतलं बांडगूळ, संवैधानिक पदाचे खूळ !

## संपादकीय...

सत्ताधाऱ्याच्या मर्जीनुसारच राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष विधान परिषद सभापती, लोकसभाध्यक्ष, राज्यपाल, सभापती पदे, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती पदे ही राजकीय सोयीनुसारच संवैधानिकपदे असतात. अशा या संवैधानिक पदावर कार्यरत असलेल्यांना कांही अधिकार असतात पण तयास मर्यादाही असतात. विधीमंडळात राज्यपालपद हे आणी लोकसभेत राष्ट्रपतीपद हे सवोच्च असले तरी ते लोकनियूक्त सदस्यानावारंवार कोंडीत पकडून ठेवू शकत नाही हे वास्तव असतानाही एक, दोन राज्यातील राज्यपालानी विधीमंडळाने पारीत केलेले अनेक ठराव नाहकपणे प्रलंबित ठेवले, प्रलंबित ठेवणे, बाबत ठराविक कालावधी नसला तरी मगरुरी आणी सत्ताधारी नेतृत्वाच्या सांगण्यावरुन कोणी राज्यपाल तशी मनमानी करीत असेल आणी त्यास सवोच्च न्यायालयात आव्हाण दिले असेल तर त्यात न्यायसंस्था हस्तक्षेप करुन लोकनियूक्त विधीमंडळ सदस्य, लोकसभा सदस्याना न्याय देवू शकते कारण संवैधानिक पदावरील व्यक्ती पेक्षा लोकनियूक्त सदस्याना लोकशाही, संविधानाने अधिकचे महत्व दिल्याचे अधोरेखित होते त्यासाठी राज्यपालानी विनाकारण विधीमंडळाने पारीत केलेले ठराव, विधेयक प्रलंबित ठेवले तर लोकप्रतिनिधी, कायदेमंडळच निष्प्रभ होईल असे स्पष्टीकरण सवोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिश भुषण गवई यांच्या पाच सदस्यीय खंडपिठाने राष्ट्रपती मूर्मू यानी सर्वोच्च न्यायालयाला विचारलेल्या प्रश्नावरील यूक्तीवादावर मत व्यक्त करताना खंडपिठाने तसे सूनावलेवरुन महाराष्ट्रासह अनेक राज्यपालाचे धाबे दणाणलयाचे दिसते आहे.

मागील काळात भाजपाशासीत एका राज्यातील राज्यपाल महोदयानी तेथील विरोधी पक्षानी मांडलेले न्यायीक विधेयक जाणीवपूर्वक अडगळीत टाकले होते तेच विधेयक न्यायासाठी सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले असता सरन्यायाधिश भूषण गवई यानीच राज्यपाल व तेथील सरकारला खडे बोल सूनावत ते विधेयक पारीत करण्यास भाग पाडले होते. परंतू सन्मानणीय राष्ट्रपती द्रोपदी मूर्मू यानीच सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशानाच आव्हान करुन कांही प्रश्न उपस्थित केल्याने सर्वोच्च न्यायालयाने चक्क कांही चूकीचे घडत असेल तर त्यावर उपाय काय ? लोकनियूक्त सरकार राज्यपालाच्या मर्जीनुसार चालते काय ? निष्क्रियतेचे न्यायालयीन अवलोकन रोखता येते काय ? असा उलट प्रश्न विचारुन याचिकाकर्त्याची बोलणीच बंद केल्याने सत्तेच्या मर्जीतलं बांडगूळ हेच संवैधानिक पदाचे खूळ असले तरी लोकनियूक्त सरकार किंवा लाकनियूक्त विरोधी लोकप्रतिनिधीना अडसर ठरु शकत नाही असेच संकेत न्यायसंस्थेने दिल्याने महायूती सरकारचे धाबे दणाणल्याचे बोलले जाते आहे.

मागील कांही वर्षापासून महाराष्ट्रातील सरकार, राज्यपाल, विधानसभा अध्यक्षानी विरोधकाचे प्रस्ताव, विधेयके प्रलंबित ठेवून राज्यपाल, विधानसभा अध्यक्षानी केवळ सत्ताधाऱ्याची भाटगिरी केली असली तरी उद्याचा काळ साक्षमोक्ष करणाराच ठरावा अशीच स्थिती निर्माण झाल्याचे दिसते आहे. कारण विधेयकाना मंजूरी देण्यासाठी राष्ट्रपती किंवा राज्यपालाना न्यायालय निश्चित मर्यादा आखून देऊ शकते काय या संवैधानिक पदावरील राष्ट्रपती द्रोपदी मूर्मू यानी विचारलेल्या प्रश्नावरचा हा निकष खंडपिठानेच विचारपूर्वकपणे हाताळून संवैधानिक पदावरील व्यक्ती विधेयक मंजूरीस अडसर करत असतील तसे त्यांचे वर्तन असेल तर कायदेमंडळ निष्प्रभ होईल आणी लोकशाही संविधानच कमकूवत होईल याचे भान ठेवणे अगत्याचे असल्याचे स्पष्ट केल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी वगैरे खिन्न, सून्न झाले असतील तर त्यात नवल कसले ?

## राष्ट्रीय अंतराळ दिवस

आज २३ ऑगस्ट, आजचा दिवस संपूर्ण भारतात राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून संपूर्ण साजरा केला जातो. २३ ऑगस्ट हा दिवस भारताच्या अंतराळ इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला कारण याच दिवशी भारताने चंद्रावर तिरंगा फडकावला. या गौरवशाली घटनेची आठवण म्हणून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून घोषित केली. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीयांच्या मनात या दिवसाची स्मृती कायमस्वरूपी कोरली गेली या महान दिवसाला आज दोन वर्ष पूर्ण होत आहे.

२३ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताच्या चांद्रयान ३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग केले आणि इतिहास घडला. चंद्रावर यशस्वीपणे यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा तर दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश बनला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात भारताने चंद्रावर स्वारी केली यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. भारताची ही चांद्र मोहीम चांद्रयान – ३ या नावाने ओळखली जाते.

याआधी भारताने दोनदा चंद्रावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने तो अपयशी ठरला. २००८ साली चांद्रयान १ या मोहिमेस इस्रोने सुरवात केली त्यानंतर २०१९ साली चांद्रयान २ मोहिमेतील यान चंद्राच्या कक्षेत पोहचूनही सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर विसंगतीमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरविण्यास अपयशी ठरले होते. अर्थात चांद्रयान २ पूर्णपणे अपयशी ठरले असेही म्हणता येणार नाही कारण चांद्रयान २ मोहिमेवेळी पाठवलेले ऑरबीटर चंद्राच्या कक्षेत यशस्वीपणे कार्यरत होते. या ऑरबीटरवरील काही उपकरणे वापरून चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीचा अभ्यास केला जात होता. तसेच चंद्र व त्याच्या वातावरणाविषयी नवी वैज्ञानिक माहिती अपल्याला मिळत होती. चांद्रयान ३ हा आधीच्या म्हणजे चांद्रयान २ , मोहिमेचाच भाग होता.

या मोहिमेत अपयश आले तेंव्हा यानाचा संपर्क तुटला म्हणून केवल संपर्क तुटा है.... हौसला नहीं! असे म्हणत देशातील १४० कोटी जनता शास्त्रज्ञांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली. देशातील जनतेला देशातील शास्त्रज्ञांविषयी कमालीचा आदर आणि विश्र्वास आहे याच विश्र्वासाच्या बळावर आपल्या शास्त्रज्ञांनी चांद्रयान २ मोहिमेत आलेले अपयश विसरून नव्याने सुरवात केली. चांद्रयान २ मोहिमेच्या अपयशातून धडा घेत चांद्रयान ३ मोहिमेवेळी शास्त्रज्ञांनी पुरेपूर काळजी घेतली होती. यानातील काही घटक ऐनवेळी कार्यन्वित होऊ शकले नाही तरी यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेल अशी नव्या यानात रचना करण्यात केल्याची माहिती इस्रोचे संचालक एम सोमनाथ यांनी दिली होती. सेन्सर निकामी होणे, इंजिनमध्ये बिघाड होणे, संगणकातील नियमसंच व गणितीय प्रक्रिया यात होणाऱ्या चुकांची तपासणी करून त्याचे निराकरण करणे यासारख्या बाबींचा विचार करूनच हे यान चंद्रावर झेपावले होते त्यामुळे यावेळी चंद्रयान ३ यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेलच असा विश्र्वास देशातील १४० कोटी जनतेला होता. इस्रोच्या शास्त्रज्ञांनी अखेर हा विश्र्वास सार्थ ठरवला.

चांद्रयान ३ मोहीम ही भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. भारताचे हे यान चंद्रावर उतरल्याने चंद्रावर यान उतरवण्यात यशस्वी ठरलेल्या काही मोजक्या देशात भारताचा समावेश झाला. या मोहिमेद्वारे आपल्या देशातील विकसीत तंत्रज्ञान जगाला दाखवण्याची संधी मिळाली. अंतराळ तंत्रज्ञान व उद्योग यांची सांगड घालून अर्थव्यवस्थेला गती मिळाली. ही मोहीम यशस्वी झाल्याने भविष्यात चंद्रावर मानव पाठवण्याचे स्वप्न साकार होईल. ही मोहीम यशस्वी झाल्याने भारत अंतराळ क्षेत्रात एक महासत्ता म्हणून उदयास आली एकूणच भारताच्या अंतराळ क्षेत्रात चांद्रयान ३ मोहीम हा मैलाचा दगड ठरली. आपल्या शास्त्रज्ञांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी रात्रीचा दिवस केला. त्यांच्या या मेहनतीला अखेर यश मिळाले आणि आपली ही चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाली.

चंद्रावर तिरंगा फडककवून भारताने जगाला दाखवून दिले की अंतराळ क्षेत्रात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे. ७८ वर्षांपूर्वी जेंव्हा भारत इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला तेंव्हा भारत सुईचे टोकही बनवू शकणार नाही अशी आपली हेटाळणी केली जायची. जो देश सुईचे टोकही बनवू शकत नव्हता त्या देशाने आज चंद्रावर स्वारी केली आहे हे भारताच्या आजवरच्या सर्व शास्त्रज्ञांचे आणि सरकारचे यश आहे. या यशाचा देशातील १४० कोटी देशवासीयांना सार्थ अभिमान आहे. चंद्रावर तिरंगा फडकावून अंतराळ क्षेत्रात महासत्ता होण्याच्या दृष्टीने पाऊल टाकणाऱ्या सर्व भारतीयांना राष्ट्रीय अंतराळ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## विद्यार्थ्यांना आत्मविश्र्वासाने यशस्वी होण्यासाठी आकाश एज्युकेशनल सर्विसेस एकमेव पर्याय, आकाश ब्रांच हेड शालिक मापारी यांची लातूर येथील पत्रकार परिषदेत माहिती



लातूरः– (संतोष सोनवण) : मागील १६ वर्षांपासून सर्विसेसचा पर्याय विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना यशात रुपांतरित करत आलेल्या 'आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड' (एईएसएल) देशातील अग्रगण्य टेस्ट प्रिपरेटरी संस्थेने आपल्या प्रतिष्ठित उपक्रमाची 'अँथे २०२५' (आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम) घोषणा केली आहे. भारतीय शैक्षणिक क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वाची ही परीक्षा असून, इयत्ता पाचवी (५)ते (१२) बारावीच्या विद्यार्थ्यांना आत्मविश्र्वासाने आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम करणे हा या परीक्षेचा मुख्य उद्देश असल्याचे 'आकाश'चे शालिक मापारी ब्रांच हेड यांनी सांगितले.

'अँथे २०२५'च्या लॉचिंगप्रसंगी ते शुक्रवार (दि.२२) रोजी लातूर येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. यावेळी स्थानिक आकाश संस्थेतील क्षितिज जैन अकॅडमी हेड मेडिकल, संजय कौळ अकॅडमिक हेड फाउंडेशन, दिग्विजय कांबळे असिस्टंट मॅनेजर लातूर येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्री. मापारी म्हणाले की, 'अँथे' ही परीक्षा आज संपूर्ण भारतभरातील विद्यार्थ्यांसाठी संधीचे प्रतीक बनली आहे. मागील १६ वर्षांपासून आम्ही हुशार आणि गुणी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करता यावा यासाठी मदत करत आलो आहोत. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांची आर्थिक पार्श्र्वभूमी किंवा स्थान कुठलेही असो, 'आकाश'मध्ये अशा विद्यार्थ्यांची क्षमता शोधून त्यांना शिक्षणासाठी चालना दिली जाते. या वर्षापासून आकाश इन्व्हिक्टसएस टेस्ट देखील सुरु करणार असून, जो शिष्यवृत्ती आणि इन्व्हिक्ट्स प्रवेशासाठी घेतला जाईल. हा कोर्स जेईई ॲडव्हान्सच्या तयारीसाठी खास डिझाईन केल्याचेही श्री. मापारी यांनी स्पष्ट केले.

अशी असेल परीक्षा

'अँथे २०२५' ही परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून घेतली जाईल. जेणेकरून देशभरातील विद्यार्थ्यांना सोयीस्कर पर्याय मिळेल. 'अँथे' ची ऑनलाइन परीक्षा ४ ते १२ ऑक्टोबर दरम्यान होईल. विशेष म्हणजे विद्यार्थी त्यांना सोयीच्या वेळेत एक तासाचं स्लॉट निवडून ही परीक्षा देऊ शकतील. ऑफलाइन परीक्षा ५ आणि १२ ऑक्टोबर रोजी भारतातील २६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ४१५ पेक्षा जास्त आकाश सेंटर्सवर होणार आहे.

कशी कराल नोंदणी

'अंथे' साठी नोंदणी सुरु झाली आहे. विद्यार्थ्यांनी ह्ीिीिः//रपींहश.रस्रधरीह.रल.ळप/होश या वेबसाईटवर जाऊन ऑनलाइन नोंदणी करु शकतात किंवा जवळच्या आकाश सेंटरला भेट देऊ शकतात. परीक्षा शुल्क ऑनलाइन आणि आफलाईन दोन्हीसाठी ३०० रुपये आहे. लवकर अर्ज करणाऱ्यांना ५० टक्के सूट मिळेल. ऑनलाइन परीक्षेसाठी निवडलेल्या तारखेच्या तीन दिवस आधी आणि ऑफलाइन परीक्षेसाठी सात दिवस आधी अर्ज करणे आवश्यक आहे. प्रवेशपत्र परीक्षा तारखेच्या पाच दिवस अगोदर मिळेल, असेही मापारी यांनी सांगितले आहे.,

## झरोका

एक – अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉग्रेसच्या राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार या राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कार्यक्रमात कशा काय गेल्या, याचे आश्चर्य वाटते. राष्ट्रवादी कॉग्रेस तर शिव, फूले, शाहू, आंबेडकर यांचा वारसा सांगते, धर्मनिरपेक्ष, पूरोगामीत्वाचा नारा देते. हे खूद्द अजित दादानीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार मध्ये शपथविधी घेतल्यानंतर पत्रकाराना सांगीतले होते तरी ही सुनेत्रा पवार यानी असे कसे काय केले तेच कळत नाही, डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, प्रधान मंत्री हे कोणा पक्षाचे असले तरी त्याना संवैधानिक पदावर कार्य करताना जात, धर्म, पक्ष वर्ज्य असतो ते सार्वजनिक व्यासपिठावर जाऊ शकतात, गैरसमज करुन घेवू नकोस.

एक – अहो, त्या अभिनेत्री असलेल्या भाजपा खासदार कंगना रानावत, रानौत यांच्या निवासस्थानी राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, भाजपा महिला खासदाराचा घरगूती कार्यक्रमात राष्ट्रवादी कॉग्रेसच्या खा. सुनेत्रा पवार या कशा काय गेल्या हा प्रश्न महत्वाचा आहे तूम्ही कशाला फाटे फोडता.

दुसरा – अरे, अजितदादानी त्यांची भूमिका मांडतानाच केवळ जनतेच्या, मतदार संघासह महाराष्ट्राचा विकास साधण्यासाठी मी भाजप, शिंदे सेने बरोबर जातो आहे असे स्पष्ट केले आहे मग खा. सुनेत्रा पवार या भाजपा खासदार महिलेच्या घरी गेल्यावर तूझे काय बिघडते आहे.

एक – अहो, पक्षाची, स्वतःची कांही नितीमूल्ये असतात की नाही म्हणून बोलतो आहे समजलं.

दुसरा – अरे, संघाच्या कार्यक्रमात खा. सुनेत्रा पवार उपस्थित कशा असा सवाल कार्यकर्ते व पत्रकारानी विचारला असता अजित दादा पवार यानी बायको सुनेत्रा मिनिटा, मिनिटाला कोठे जाते हे मी विचारत नाही म्हणून बगल दिली यातच ओळखून घेतले पाहीजे.

## काय बोलता राव ?

महाराष्ट्रासह सारा भारत नागरी समस्या, सर्वांगीण, भौतीक विकासासाठी तडफडतो आहे, सुशिक्षीत बेकार नोकरी, नोकरी म्हणून भिकेला लागलेत, शेतमजूर, कामगार, कष्टकरी, हाताला काम नाही म्हणून उपासमारीतत जगत आहेत, शिक्षणाचा बाजार महागडा झाल्याने गाव, खेडे, पाडे, तांडे, पालातील लेकरं शिक्षणासाठी वन, वन करीत आहेत. गोर, गरीब फूकटचे कूजके अन्न खाऊन रोगराईत खितपत आहेत तरी ही प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विकासाच्या, सामाजीक न्यायाच्या गप्पा मारीत आहेत आणी लोक ही त्यांनाच डोक्यावर घेवून नाचत आहेत कांहीच कळत नाही.

### काय बोलता राव !

अरे, प्रधानमंत्री मोदीजी, मुख्यमंत्री फडणवीसजी यांची सर्वांगीण विकास, सामाजीक न्यायाची व्याख्या वेगळीच आहे ते तूला कळत नाही, कारण प्रकल्प केंद्री सरकार महामार्ग, रस्तेबांधणी, उड्डाण पूलं निर्मिती, रिंग रोड निर्मिती, मेट्रो, विमानतळं उभारणी, बंदरे विकास म्हणजे नागरी समस्या सोडविणे, सर्वांगीण, भौतीक विकास साधणे, सामाजीक न्यायाची प्रक्रिया पूर्ण करणे वगैरे, वगैरे म्हणजेच विकास आणी महाराष्ट्राची प्रगती, भारत महासत्ता होण्यासाठीचे संकेतंच म्हणून समजावे समजलं, मग बोला दाजीबा !

## कॉँग्रेस आणि भाजपच्या कारवतले गोचीड !

कॉँग्रेसमधून भाजपमध्ये आणि भाजपमधून कॉँग्रेसमध्ये गेलेल्या नेत्यांचे आम्हाला फारसे नवल नाही. हे दोन्ही पक्ष एकाच विचारधारेचे आहेत. इतकेच काय भारतीय कम्यूनिस्ट,तृणमूल आणि आप चे नेते इकडून तिकडे उड्या मारत असतील तर त्याचाही आमच्यावर परिणाम होणार नाही. कारण हे पक्ष सुद्धा एकाच माळेचे मणी आहेत. नैतिकता, सिद्धांत आणि मूल्यांशी यांचे काही देणे घेणे नाही. सत्तेसाठी काहीही तयार असलेली ही राजकीय जमात म्हणावी लागेल. मात्र जो नेता फुले – शाहू – आंबेडकरी विचाराचा आहे. आहे असे सांगतो आणि ही विचारधारा स्थापित व्हावी यासाठी प्रयत्नशील असतो आणि सिद्धांत मूल्यांच्या बाता मारतो,तो जेव्हा कॉँग्रेसमध्ये,भाजपमध्ये किंवा इतर ब्राह्मणी पक्षांमध्ये प्रवेश करतो, त्यांच्या सतरंज्या उचलतो तेव्हा मात्र वेदना होतात. अशा नेत्याला आंबेडकरवादी म्हणावे काय ? निश्र्चितच नाही.

सुरुवातीला आपल्या समाजासाठीही काम करत असताना त्याचा प्रामाणिक उद्देश असेलही पुढे मात्र त्याने ती विचारधारा का सोडली ? आणि शत्रू सोबत का गेला ? याचा विचार होणे आवश्यक आहे. सुरुवातीला फुले – आंबेडकरांचे नाव घेऊन लोकांचे लक्ष वेधावे,व्यवस्थेत बसलेल्यांनी दखल घ्यावी, असे कृत्य करावे आणि पुढे प्रस्थापितांच्या छावणीत शिरावे,हा नवा ट्रेंड अलीकडे जोमात सुरु आहे. उदितराज,रामदास आठवले,जोगेंद्र कवडे अलीकडे जिग्नेश मेवाणी,प्रा.रतनलाल आणि असे कितीतरी पायलीचे पन्नास सांगता येतील.काहींची तर ढाण्या वाघ,पँथर म्हणून ओळख होती.उड्या जावून मात्र मांजर बनून म्यावं म्यावं करत आहेत.ओबीसीच्या नेत्यांवर तर आम्ही फारसे बोलणार नाही. दोन चार अपवाद सोडले तर सगळे प्रतिगामी पक्षांच्या दावणीला बांधलेले आहेत. तामिळनाडू मध्ये जी आज सत्ता आहे ते पेरियार रामासामी यांच्या आंदोलनाचे फलीत आहे. फुले – शाहू – आंबेडकरांच्या भूमीत महाराष्ट्राच्या एससी,एसटी आणि ओबीसी नेत्यांना जमले नाही. संख्याबळ असूनही नवा पर्याय देण्याची धमक नाही. म्हणून सर्वांचे आयत्या पीठावर रेघोट्या मारणे सुरु आहे.

बरे, ही आताच किड लागली आहे काय ? बिलकुल नाही. दुसरे असे की यांच्याशिवाय प्रतिगाम्यांचे पक्ष चालत नाहीत काय ? असेही नाही.या पक्षांना राखीव मतदार संघासाठी प्रतिनिधी हवे असतात.जेवढा नालायक नेता असेल तेवढे त्या पक्षाच्या फायद्याचे. नेत्यांनाही सत्तेची फळे पाहिजेत.अशा वेळी अपमान झाला तरी चालेल.ही परंपरा अगदी बाबू जग जीवनराम पासून सुरु आहे.मात्र ज्यांनी कॉँग्रेस आणि भाजपच्या ऑफर ठोकरीने उडवल्यात ते धन्यवादाचे पात्र आहेत.अशा प्रामाणिक आणि त्यागी नेत्यांचीही मोठी परंपरा आहे, जी समाजात सातत्याने ऊर्जा निर्माण करते,समाजाला आंदोलीत करते.अशा लोकांची संख्या मात्र कमी आहे.

राष्ट्रीय कॉँग्रेसची स्थापना १८८५ झाली. त्याआधी राष्ट्रपिता जोतिराव फुले यांनी १८७३ ला सत्यशोधक समाजाची निर्मित केली होती. सत्याचा शोध घेणाऱ्या या संघटनेत शूद्र – अतिशूद्र आणि महिलांना विशेष स्थान होते. पुढे कॉँग्रेस स्थापन झाल्यानंतरही कोणी कॉँग्रेसकडे ढुंकूनही बघत नव्हते.कारण त्या संघटनेत त्याकाळचे भांडवलदार, संस्थानिक आणि उच्च जातीचाच भरणा होता.कॉँग्रेसच्या संदर्भात राष्ट्रपिता जोतीराव फुले प्रश्र्न करतात, ज्या राष्ट्रीय कॉँग्रेसमध्ये मांगा – महारांना स्थान नाही,ती कॉँग्रेस राष्ट्रीय कॉँग्रेस कशी असू शकते ? फुलेंची बुद्धी,अभ्यास, दरारा आणि तर्कशक्ति पुढे कॉँग्रेसच्या नेत्यांचे शहाणपण टिकले नाही. पुढे मात्र त्यांच्या निधनानंतर २० – ३० वर्षात सत्यशोधक समाजाचा प्रभाव कमी झाला.राजाश्रय देणाऱ्या शाहू महाराजांचेही निधन झाले.तिथूनच खऱ्या अर्थाने वाताहत सुरु झाली. सत्यशोधक समाजाचे बिनीचे कार्यकर्ते कॉँग्रेसमध्ये सामील झालेत.शेवटी बाबासाहेबांना म्हणावे लागले की, आता मी एकटा फुलेंचा अनुयायी म्हणून बाकी आहे. आताच्या तथाकथित फुलेंच्या अनुयायांची लाचारी खूपच टोकाला गेली आहे. समता परिषदेच्या छगन भुजबळांच्या माकड उड्या तर बघवत नाहीत.

राजकारणामध्ये राष्ट्रपिता फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छ.शिवाजी महाराज हे महानायक ब्रँड बनले आहेत.अगदी विषमतवादी – प्रतिगामी पक्षांच्या स्टेजवर या महापुरुषांचे फोटो असतात.या सर्व पक्षांना संविधानाचा अचानक पुळका आला आहे.जो तो पक्ष संविधान वाचवण्यासाठी पुढे सरसावला आहे.आमचा सवाल आहे, आतापर्यंत तर तुम्हीच सत्तेत आहात.मग याच संविधानाची अमलबजावणी का केली नाही ? ते त्यांच्या पूर्वजांनी केलेल्या चुकीची आम्ही माफी मागायला तयार आहेत.हा खोटा आव असला तरी मात्र ते सत्तेसाठी माफी मागत आहेत. कॉँग्रेसने आपला अजेंडा बदललेला आहे. सांगायचे फुले – आंबेडकरांचे विचार मात्र करायचे तेच जे त्यांच्या नेहरू गांधी,वाजपेयी नेत्यांनी केले. देशभर हातात संविधान घेऊन राहुल गांधी फिरतो तेव्हा आमच्या तथाकथित नेत्यांचा ऊर भरून येतो ही व्यक्ती पूजेची परिसीमाच म्हणावी लागेल.जी लोकशाहीस घातक आहे.

स्वतःला राष्ट्रवादी,लोकशाहीवादी,फुले – आंबेडकरवादी म्हणवून घेणारे पक्षातील प्रमुख डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतलेल्या बुद्ध कालीन संसदीय लोकशाही प्रक्रियेबाबत अनभिज्ञ आहेत असे नाही. त्यांना ती संपूर्ण प्रक्रिया माहित आहे.मात्र त्यांच्या आचरणात ती नाही. ते सुद्धा लोकशाहीच्या आडून फुले – आंबेडकरांच्या विचाराशी बेईमानी करत आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,जगात इतर कोणत्याही देशापेक्षा भारतात विभूतीपूजेचे फार माजले माजविले जाते.धार्मिकदृष्ट्या भक्ती हा मोक्षाचा मार्ग असू शकेल,परंतु राजकारणात भक्ती किंवा विभूतीपूजा हा अखेर हुकूमशाकडे जाणारा धोक्याचा मार्ग आहे.

एखाद्या व्यक्तीचे कर्तुत्व फार मोठे असते ते आपण मान्य केले पाहिजे. नाही तर तो आपला करंटेपणा ठरेल. परंतु कर्तुत्वाची नेमकी परिभाषा आम्हाला ठरविता आली पाहिजे. जे देशासाठी समाजासाठी कार्य करतात, ते धन्य होत. परंतु काही व्यक्ती देशविघातक,लोकशाही मारक,नैतिक मुल्यांचे उल्लंघन करून विषमतावादी पक्षांसोबत घरोबा करत असतील तर ते घातक आहे.आपण वेळीच सावध असले पाहिजे, नाहीतर आपल्या शेकडो पिढ्या बरबाद होतील आणि अशा अधोगतीस या नेत्यांबरोबर आपणही तेवढेच जबाबदार असणार आहोत.

**जीवन गावंडे,७३५०४४२९२०,नागपूर.**

## सलग दुस-या दिवशी सिंगल युज प्लास्टिक बंदी बाबत मनपाची कारवाइ



लातूर /प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांच्या उपस्थितीमध्ये आज सिंगल युज प्लास्टिक बंदी बाबत शहरातील गंजगोलाई भागातील दोन गोडावुन मध्ये धडक कारवाई करून एकूण ५५० किलो (अंदाजे ८० हजार रूपये किंमतीचा प्लास्टिक साठा) जप्त करण्यात आला.

सदरील कारवाई मध्ये मुख्य स्वच्छता अधिकारी कलिम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवि कांबळे, धोंडिबा सोनवणे, अक्रम शेख यांच्यासह अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

ही मोहीम अशीच सुरू राहणार असून आगामी सणासुदीच्या दिवसांमध्ये नागरिकांनी प्लास्टिक कॅरीबग वापर टाळून कापडी बॅगचा वापर करावा व पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा असे आवाहन उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे.

## आंतरराष्ट्रीय सहकार्याने नव्या तंत्रज्ञानाला चालना

लातूर : शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी डिपार्टमेंट ऑफ फिजिक्स अँड इलेक्ट्रॉनिक्स आणि बिनस युनिव्हर्सिटी, इंडोनेशिया यांच्यात रोबोटिक्स, वायरलेस सेन्सर नेटवर्क आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स या अत्याधुनिक तंत्रज्ञान विषयांवर शैक्षणिक व संशोधन कायदेशीर करार केला आहे.आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात रोबोटिक्स, वायरलेस सेन्सर नेटवर्क आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही क्षेत्रे जगभरात संशोधन आणि औद्योगिक क्रांतीची नवी दारे उघडत आहेत.



या पार्श्वभूमीवर डॉ. टी. एच. मुजावर, इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख, दयानंद विज्ञान महाविद्यालय यांनी बिनस ग्रॅज्युएट प्रोग्राम, बिनस युनिव्हर्सिटी, इंडोनेशिया यांच्यासोबत शैक्षणिक आणि संशोधन कायदेशीर करार करून एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.यामुळे विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष प्रयोग, प्रकल्प कार्य, संयुक्त संशोधन व आंतरराष्ट्रीय आदानप्रदान कार्यक्रमाचा लाभ घेता येणार आहे. यामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण अधिक गतिमान होईल, तसेच विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील संशोधन व उद्योजकतेचे दालन खुले होईल.

महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांचे म्हणणे आहे की, या करारामुळे आमच्या विद्यार्थ्यांना उच्चस्तरीय संशोधनात सहभागी होता येईल. तंत्रज्ञानातील नावीन्याचा शोध घेण्याची आणि त्यातून उद्योगधंद्यांना उपयुक्त तोडगे सुचवण्याची संधी उपलब्ध होईल. विशेष म्हणजे, आजच्या औद्योगिक जगतात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि वायरलेस सेन्सर नेटवर्कचा वापर स्मार्ट सिटीज, आरोग्य सेवा, शेती, रोबोटिक्स, संरक्षण व्यवस्था अशा अनेक क्षेत्रांत झपाट्याने वाढत आहे. या पार्श्र्वभूमीवर महाविद्यालयाने केलेला हा केवळ औपचारिक करार नसून, तो विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी ज्ञान, नवोपक्रम आणि संशोधनाचे नवे क्षितिज उघडणारा ठरेल.

याउपक्रमामुळे महाविद्यालयाचे नाव केवळ राष्ट्रीय पातळीवरच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातही झळकणार आहे. अशा प्रकारचे सहकार्य भारतीय महाविद्यालयांनी जागतिक दर्जा मिळविण्यासाठी घेतलेली धडपड अधिक ठळकपणे अधोरेखित करते.

या करारामुळे दोन्ही संस्थांदरम्यान संयुक्त संशोधन, प्रकल्प कार्य, विद्यार्थी व शिक्षक आदानप्रदान, ऑनलाईन व्याख्याने, तसेच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच त्यांनी असे म्हटले की

या कायदेशीर करारामुळे आमच्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील शैक्षणिक व संशोधनाच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांचे करिअर घडविण्यासाठी हा करार महत्त्वाचा टप्पा ठरेल. , या करारामुळे आमच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे तांत्रिक ज्ञान व कौशल्य मिळेल. यामुळे नाविन्यपूर्ण संशोधन व उद्योजकतेस नवे आयाम मिळतील.

या यशाबद्दल डॉ. टी. एच.मुजावर, इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला असून, पुढील काळात या सहकार्याचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी महाविद्यालय कटिबद्ध आहे.या करारानुसार विद्यार्थी व शिक्षक आदानप्रदान कार्यक्रम, संयुक्त संशोधन प्रकल्प, शैक्षणिक परिषद, कार्यशाळा तसेच इतर शैक्षणिक उपक्रम राबविण्याचे ठरले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्ञान, कौशल्य आणि संशोधनाची नवी दारे खुली होणार आहेत.

तसेच आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे प्रतिनिधी प्रा. सानी इसा, व प्रो. फोर्ड यांनी या कराराद्वारे दोन्ही संस्थांमध्ये शैक्षणिक व सांस्कृतिक देवाणघेवाण होऊन परस्पर सहकार्य अधिक दृढ होईल, असा विश्र्वास व्यक्त केला.

# महात्मा बसवेश्र्वर कनिष्ठ महाविद्यालयात कला व वाणिज्य शाखा विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा उत्साहात संपन्न

लातूर : महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाची स्थापना सन १९७० रोजी झाली. तेव्हापासून आजपर्यंत या महाविद्यालयातर्फे अनेक गरजू, गरीब आणि गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येत आहे त्यातून अनेक विद्यार्थी हे आज उच्च पदावर कार्यरत आहे त्यामुळे महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय हे गरीब, गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांचे गुरुकुल आहे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी व्यक्त केले.



महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्र्वर कनिष्ठ महाविद्यालयात कला व वाणिज्य शाखा विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. वनिता पाटील, पर्यवेक्षक एन. ए. गोरे, कला शाखा समन्वयक प्रा. विश्र्वनाथ स्वामी, प्रा. रवींद्र सोनोने, वाणिज्य शाखा समन्वयक प्रा. वैशाली जयशेट्टे, प्रा. शैलेश कानडे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंद्रगे आणि पालक प्रतिनिधी विठ्ठल शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि जगतज्योती महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

यावेळी संगीत विभागातील प्रा.विश्र्वनाथ स्वामी, डॉ.अश्र्विनी रोडे, विकास पांचाळ, मिताली आगलावे आणि त्यांचा चमू यांनी स्वागत आणि देशभक्तीपर गीत सादर केले.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आणि उपप्राचार्य प्रा. वनिता पाटील यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांचाही सत्कार करण्यात आला

पुढे बोलताना संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, या महाविद्यालयाची एक विशेष ओळख राहिलेली आहे. या संस्थेची स्थापना होतकरू आणि गरीब मुलांना शिक्षण मिळावे या विचारातून झालेली आहे त्याच विचाराचे पालन करत ही संस्था मार्गक्रमन करीत आहे. कला व वाणिज्य शाखेतून देशासाठी उत्तम नेतृत्व करणारे प्रतिनिधी घडलेले आहेत म्हणून या क्षेत्रातूनही उज्वल यश विद्यार्थ्यांना संपादन करता येणार आहे. यासाठी या संस्थेअंतर्गत चालणाऱ्या या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना काळानुरूप अनेक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य निरंतरपणे केले जात आहे असेही ते म्हणाले.

यावेळी कला शाखा समन्वयक प्रा. रवींद्र सोनोने आणि वाणिज्य शाखा समन्वयक समन्वयक प्रा. वैशाली जयशेट्टे यांनी कला आणि वाणिज्य विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती विद्यार्थी आणि पालकांना यावेळी दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक प्रा. एन. ए. गोरे यांनी केले तर उपप्राचार्य प्रा. वनिता पाटील यांनी गुणवंत विद्यार्थी आणि पालकांचे मनोबल वाढविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे असे सांगून कला आणि वाणिज्य विभागातील शिक्षकेतर कर्मचारी यांचाही सत्कार केला

यावेळी पालक शेवाळे विठ्ठल आणि विद्यार्थिनी गुडापे गायत्री यांनीही आपआपली मनोगते व्यक्त केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. घनश्यआम ताडेवार आणि डॉ. अश्र्विनी रोडे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. विश्र्वनाथ स्वामी यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सय्यद जलील, आनंद खोपे, रमेश राठोड, संतोष राठोड, बालाजी होनराव, गुरुप्रसाद बिराजदार, शेख नगमा आणि लोंढे ताई परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला कनिष्ठ महाविद्यालयातील कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# लातूरकरांचे विमान प्रवासाचे स्वप्न लवकरच वास्तवात उतरणार : खा. डॉ. शिवाजी काळगे

लातूर : लातूरकरांचे विमान प्रवासाचे स्वप्न लवकरच वास्तवात उतरणार असल्याची ग्वाही लातूर लोकसभा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशी प्रत्यक्ष झालेल्या बैठकीनंतर दिली.

लातूरला नियमितपणे विमान सेवा सुरु करण्यात यावी, अशी मागणी मागच्या अनेक वर्षांपासून सातत्याने लावून धरली जात आहे. लातूर हे शैक्षणिक, आद्योगिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या एक विकसनशील शहर आहे. लातूरला हवाई वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात आणि या ठिकाणाहून लवकरात लवकर विमान सेवा सुरु करावी, या मागणीसाठी खा. डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी गुरुवारी, दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी नवी दिल्लीत मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन याबाबतीत विस्तृत अशी



चर्चा केली. लातूरला विमान सेवा सुरु करणे किती आवश्यक आहे, ही बाबही त्यांनी मोहोळ यांच्या निदर्शनास आणून दिली. खा. काळगे यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी लातूरहुन लवकरात लवकर विमान सेवा सुरु करण्यास संमती दर्शवली. केवळ संमतीच दर्शवली नाही तर मागच्या अनेक वर्षांपासून एमआयडीसीकडे असलेला लातूर विमानतळाचा ताबा गुरुवार पासूनच एमएडीसी अर्थात महाराष्ट्र एव्हिएशन डेव्हलपमेंट कंपनीकडे ( महाराष्ट्र विमान वाहतूक विकास कंपनी ) हस्तांतरित करण्यात आला आहे. आता या विमानतळाचे सर्वस्वी अधिकार एमएडीसी आल्याने या संदर्भात लवकरच बैठक घेऊन पुढील निर्णय घेण्याचे आश्र्वासन दिल्याची माहिती खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी दिली.

लातूरला विमानसेवा सुरु झाल्यासत्याचा लातूरसह मराठवाडा आणि परिसरातील व्यावसायिक, उद्योजक आणि सामान्य नागरिकांची चांगली सोय होणार आहे. खा. डॉ. काळगे यांच्या या यशस्वी प्रयत्नाबद्दल लातूर लोकसभा मतदार संघातील मतदारांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

# सामाजिक बांधिलकीतून गरीब विद्यार्थिनीला IIT करिता आर्थिक मदत.

वर्धा (प्रतिनिधी) स्थानिक शिवनगर येथील व भाजीपाल्याच्या दुकानावर रोजंदारीने काम करणाऱ्या मजुराची मुलगी कुमारी संबोधी शंकर गोडघाटे हिने गएए परीक्षेत यश मिळवत कर्नाटक,धारवाड येथील आयआयआयटी महाविद्यालयात बी.टेक प्रवेशासाठी पात्रता मिळवली आहे. प्रवेशाची अंतिम तारीख २३ ऑगस्ट होती,घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती तिच्या मार्गात अडसर ठरत होती.ही बाब आदर्श शिक्षक व स्वतंत्र समता शिक्षक संघांचे जिल्हाध्यक्ष गौतम पाटील यांना समजल्यावर त्यांनी सामाजिक कार्यकर्ते राजू थुल,सुरेश वैद्य यांच्यासह संबोधीच्या घरी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. शिक्षणाच्या या महत्त्वाच्या टप्प्यावर आर्थिक मदतीची गरज ओळखून, शिक्षक गौतम पाटील यांनी व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून समाजातील दानशूर नागरिकांना मदतीचे आवाहन केले.आणि अवघ्या तीन दिवसांत रुपये ६०,३०० इतकी रक्कम जमा झाली.त्यामुळे संबोधीच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला. दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी प्रत्यक्ष तिच्या घरी जाऊन तिच्या यशाबद्दल सत्कार करून गोळा झालेला निधी तिला प्रदान करण्यात आला.या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते गौतम पाटील सह राजू थुल,सुरेश वैद्य,सुनील ढाले,सुभाष गायकवाड,के.बी.थूल,महेंद्र बनसोड तसेच तिच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते.



शिक्षक खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना जागरूक नागरिक घडवतात.शिवनगर येथील व भाजीपाल्याच्या दुकानावर रोजंदारीने काम करणाऱ्या मजुराची मुलगी संबोधी शंकर गोडघाटे हिने गएए परीक्षेत यश मिळवत कर्नाटक,धारवाड येथील आयआयआयटी महाविद्यालयात बी.टेक प्रवेशासाठी पात्रता मिळवली आहे.पण आर्थिक परिस्थिती पुढे कशी शिक्षण घेणार ही समस्या आई वडिलांची होती.पण एका शिक्षकाने सोशल मिडियाचा वापर करून संबोधिला ची आजची समस्या सोडवली पुढच्या शिक्षणासाठी आपण ही सढळ हस्ते फक्त शंभर,दोनशे,पांचशे रुपये कुमारी संबोधी शंकर गोडघाटे ९३२५१८६०१० हिच्या फोन पे नंबर वर पाठवून आई वडिलांची व संबोधीची आर्थिक अडचण दूर करू शकता.असे गौतम पाटील अध्यक्ष स्वतंत्र समता शिक्षक संघ यांनी आवाहन केले आहे.

# हरित महाराष्ट्र,समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत भोकर नगर परिषद झाली हरितमय

भोकर /प्रतिनिधी/ जिल्हाधिकारी नांदेड यांच्या आदेशान्वये हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत भोकर नगर परिषदेच्या वतीने विविध सहा हजार देशी वृक्षांची वृक्ष लागवड करून नगरपरिषदेला हरितमय करण्यात आले आहे.



शासनाच्या हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र वर्ष २०२५ मोहिमेअंतर्गत १० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत उद्दिष्ट पूर्ण करण्यात येणार आहे. नगर विकास विभागाच्या १ कोटी वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टांपैकी नांदेड जिल्ह्यातील सर्व नगर पालिका,नगरपरिषद व नगरपंचायतिच्या क्षेत्रात एकूण ३ लाख ५३ हजार ५०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे यामध्ये २२ ऑगस्ट २०२५ रोजी या एकाच दिवशी एकुण ९० हजार वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट निश्र्चित करून दिले होते या अनुषंगाने भोकर नगरपरिषद हरित महाराष्ट्र,समृद्ध महाराष्ट्र या अभियानामध्ये हीरहिरीने भाग घेऊन २२ ऑगस्ट २५ रोजी नगरपरिषदेच्या परिसरात आवळा,जांभूळ,आंबा, जांब,करंजी,गुलमोहर,साग, पिंपळ, कडु लिंब यासारख्या विविध सहा हजार देशी वृक्षांची वृक्ष लागवड करून भोकर नगर परिषद व पूर्ण परिसर हरितमय करण्यात आले.

यावेळी स्वच्छता अभियंता सुशील खिल्लारे, अभियांता अनंत कुलकर्णी, अभियंता गजानन सावरगावंकर, जावेद इनामदार, माधव बोधगिरे, सुनिल कल्याणकर, लेखापाल गुरुनाथ कस्तुरे, सहायक लेखापाल सुदर्शन शिंदे,नगर अभियंता सुशील खाडे, करनिर्धारक मोनाली रावते, संगणक अभियंता प्रिया बारसे, रवी महाबळे, सूरज अरपल्ले , सचिन वैष्णव, सुरेश मेहनतकर, संदेश दांडगे, दत्ता आनंतवार, महेश दरबस्तरवार, त्रिरत्न कावळे, संजय पावर , बालाजी कल्याणकर, दिलिप देवतुळे, नारायण आदेवाड,शेख मगदूम आदींसह कार्यालयातील अधिकारी , स्वच्छता कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थीत होते.

## गणेश मंडळाचा पोलीस प्रशासनातर्फे होणार सन्मान - पोलीस निरीक्षक कुंभार

भोकर/ प्रतिनीधी/ नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळासाठी आपले नांदेड सुरक्षित नांदेड हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये ज्या गणेश मंडळाने सहभाग नोंदवतील त्यांचा पोलीस प्रशासनाच्या वतीने प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात येणार आहे. आगामी विविध सण उत्सवाच्या अनुषंगाने भोकर येथे आयोजित करण्यात आलेल्या शांतता कमिटीच्या बैठकीदरम्यान भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी माहिती दिली आहे.




यामध्ये शहरासह तालुक्यातील जे गणेश मंडळ विविध सामाजिक उपक्रमासह त्यांच्या मंडपामध्ये ४ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील त्या मंडळाचे भोकर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येईल. जे गणेश मंडळ त्यांच्या मंडपामध्ये ६ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील त्या मंडळाचा उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येईल.जे गणेश मंडळ त्यांच्या मंडपामध्ये १२ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील, त्या मंडळाचा सत्कार अपर पोलीस अधीक्षक, भोकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येईल. जे गणेश मंडळ त्यांच्या मंडपामध्ये १६ सीसीटीव्ही कॅमेरे लावतील, त्या मंडळाचा सत्कार पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

सदरील मंडळ हे गणेश उत्सव संपल्यानंतर गणेश मंडळाने लावलेले कॅमेरे हे त्यांचे गावातील चौकामध्ये महत्वाच्या ठिकाणी कायम स्वरुपी लावण्यात यावे. जेणेकरुन लोकसहभागातून 'आपले नांदेड सुरक्षित नांदेड ही संकलपना यशस्वी होण्यास मदत होईल. तसेच या उपक्रमा दरम्यान शहरासह तालुक्यातील ज्या गणेश मंडळाने लावलेल्या कॅमेऱ्यांची संख्या जास्त असेल त्या पोस्टे प्रभारी अधिकारी यांचा सुध्दा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

आपले नांदेड-सुरक्षित नांदेड या उपक्रमामध्ये जास्तीत जास्त गणेश मंडळांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी केले आहे.

## विधी महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश

नांदेड :- उध्दव सरोदे - येथील श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध क्रीडा स्पर्धे त घवघवीत यश संपादन केले आहे.



नुकत्याच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतर महाविद्यालयीन 'क' झोन बुद्धिबळ (मुले) स्पर्धा मुदखेड येथे पार पडल्या. सदर स्पर्धे त विधी महाविद्यालयाच्या संघाने चांगल्या खेळाचे प्रदर्शन करीत रौप्य पदक पटकाविले,कर्णधार भास्कर हस्सेकर,मोनीष जैस्वाल, आयुष डाखोरे,सुमित पाऊलकर, वेदांत घोणस व हैदर गायकवाड यांचा विजयी संघात सहभाग होता तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या स्विमिंग पूल येथे आंतर महाविद्यालयीन स्विमिंग स्पर्धा संपन्न झाल्या. सदरील स्पर्धेत विधी महाविद्यालयाचा खेळाडू सिद्धांत पोफळे (बी.ए.एल.एल.बी-२ ) याने उत्कृष्ट प्रदर्शन करीत ५० मीटर फ्रीस्टाइल,५० मीटर बॅक स्ट्रोक व ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये प्रथम स्थान प्राप्त करीत ३ गोल्ड मेडल पटकाविले.जयक्रांती महाविद्यालय लातूर येथे संपन्न झालेल्या आंतर महाविद्यालयीन फेन्सिंग स्पर्धेत विधी महाविद्यालयाचा खेळाडू श्रीराम अण्णा गरड (एल.एल.बी २) याने रौप्य पदक पटकाविले.या सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडा प्राध्यापक डॉ. चरणजीत सिंघ महाजन यांचे अतिशय महत्त्वाचे व मोलाचे मार्गदर्शन मिळाले.सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष मा.खा. अशोकरावजी चव्हाण,सचिव श्री.डी. पी.सावंत,सहसचिव डॉ.रावसाहेब शेंदारकर,कोषाध्यक्ष अॅड.उदयजी निंबाळकर,कार्यकारनी सदस्य श्री. नरेंद्र चव्हाण, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ.वीणा पाटील,प्रा.डॉ. विकास खाकरे व कार्यालयीन अधीक्षक श्री.प्रकाश शिंदे यांच्यासह सर्वांनी अभिनंदन करून पुढील कार्यास खूप खूप शुभेच्छा दिल्या.

## शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य देणारे परपरागत देशी खेळ, संस्कृती संवर्धनाचेही माध्यम - सभापती प्रा.राम शिंदे

मुंबई, : परंपरागत देशी खेळ केवळ शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य देणारेच नाहीत तर या खेळांमुळे संस्कृती संवर्धनाचे बहुमूल्य कामही होत असल्याचे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले. कुर्ला येथे पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर मैदानात आयोजित करण्यात आलेल्या ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव देशी खेळांच्या क्रीडा महाकुंभाचे पारितोषिक वितरण आणि समारोप झाला. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राजमाता पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त १३ ऑगस्टपासून क्रीडा भारतीच्या सहयोगाने या पारंपरिक देशी क्रीडा महाकुंभचे आयोजन करण्यात आले.

व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, क्रीडा भारतीचे अखिल भारतीय महामंत्री श्री. राज चौधरी, क्रीडा भारतीचे अध्यक्ष श्री. गणेश देवरुखकर, मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक श्री. मनोज रेड्डी यावेळी उपस्थित होते.

विधानपरिषदेचे सभापती श्री. राम शिंदे म्हणाले की, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून तन-मनाने सुदृढ करणाऱ्या परंपरागत खेळांच्या क्रीडा महाकुंभाचे आयोजन करण्यात आले. तसेच पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर देशी खेळांचे मैदान अल्पावधीत उभारण्यात आले. परंपरागत देशी खेळ सामान्यतः ग्रामीण भागात खेळले जातात, मात्र लोढा यांनी मुंबईसारख्या शहरात या खेळांचे आयोजन करून खऱ्या अर्थाने देशी खेळांना पुनरुज्जीवित केले.

# उपदेशकथा भक्ती

एका राजाच्या दरबारी अनेक कलावंत होते. त्यात एक नृत्यांगना होती. प्रत्येक कलावंताने दरबारात आपली कला राजापुढे प्रगट केली. अखेर त्या नृत्यांगनेने अनेक प्रकारचे नृत्य करून आपले नृत्य थांबवले. राजा अतिशय प्रसन्न झाला. त्याने तिला प्रश्न केला, ‘बाई, ही एवढी कला तुझ्या शरीरात कोठून येते? आपल्या सर्व अवयवांना तू कसे खेळवतेस?’ नृत्यांगनेने उत्तर दिले, ‘राजा, मी काय सांगू?’ मी एवढेच जाणते की, तत्त्वचिंतकाचा आत्मा त्याच्या मस्तकात वास करतो. कवीचा आत्मा त्याच्या हृदयात राहतो. गायकाचा आत्मा त्याच्या कंठात असतो. पण नर्तिकेचा आत्मा तिच्या अवघ्या शरीराला व्यापून राहिलेला असतो.’ भक्ती ही सर्वांगानी करावयाची असते. भक्ताचा ईश्वराच्या ठिकाणी असलेला भाव त्याच्या जीवनाला आतबाहेर व्यापून राहतो. तिन्ही अवस्थांमध्ये त्याला दुसरा ध्यास असत नाही.

कथा उपदेश : आपले उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल तर त्यावर सारे लक्ष केंद्रित करावयाचे असते.

## (गुरु वचन)

## जर मनच अशुद्ध तर......

खूप जुनी गोष्ट आहे. एकदा संत कबीर बसले होते. त्यांच्याकडे एक व्यापारी धावत आला. त्याने कबीरांना विनंती केली, ’मला तुम्हाला माझा गुरू करायचे आहे, तुम्ही मला गुरुमंत्र द्या’ तेव्हा संत कबीरांनी त्याला पैसे दिले आणि सांगितले आधी तू पटकन जाऊन दूध घेऊन ये, मग मी तुला गुरुमंत्र देतो.

त्या व्यापाऱ्याला खूप घाई होती. तो तडक धावत गेला आणि त्याने दूध कबीरांना आणून दिले. कबीरांनी त्याला एक भांडे दिले आणि सांगितले, हे दूध या भांड्यात ओत. त्याने ते भांडे घेतले, त्यात प्रचंड घाण साचली होती. त्या व्यापाऱ्याने कबीरांना ही बाब सांगितली. ते म्हणाले, बघ जर तू या खराब भांड्यात दूध टाकायला तयार नाहीस तर, मग मी तुझ्या अशुद्ध मनात राम नावाचा मंत्र कसा देऊ? ’

कबीरांनी म्हटलेले वाक्य किती खरे आहे बघा? जर तुमचे मनच शुद्ध नाही तर तुम्ही देवाचे दर्शन घेतले काय, किंवा संत सानिध्यात राहिलात काय, त्याचा काय परिणाम होणार?

संतांनीही हेच सांगितले आहे. भलेही तुम्ही पुजा नका करू, परंतु तुम्ही तुमचे आचरण, आणि मन शुद्ध ठेवा. आपण इतरांना एखाद्या कामासाठी दोष देत असतो, पण त्याची त्यामागची भूमिका समजून घेणे गरजेचे असते. आणि आपण नेमके या उलटच करतो.

आपल्या दैनंदिन कामात आपण अनेकांना भेटत असतो, यात प्रत्येक व्यक्ती आपल्याला चांगलीच भेटते असे नाही, तर प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असून शकतो. त्यांच्या स्वभावानुसार त्यांना काम देणे गरजेचे आहे.

बदलायची असतील तर त्यांची मने बदलण्याचा प्रयत्न तुम्ही करा. त्यांच्या मनातील कटुता कमी करा. कारण कबीरांनी म्हटल्याप्रमाणे, खराब भांड्यात ज्या प्रमाणे तुम्ही दूध नाही टाकणार त्या प्रमाणेच एखाद्याचे मन परिवर्तन झाल्याशिवाय तुम्ही त्याला बदलू नाही शकणार.

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी लातूर मध्ये

लातूर – रंगभूमीची मध्यवर्ती संघटना असलेली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती मुंबई आयोजित, शतकमहोत्सवी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त सुरू झालेला ’नाट्यकलेचा जागर’ दरवर्षी महाराष्ट्रभर विविध कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे. त्याच अनुषंगाने यंदाही ’नाट्य परिषद करंडक’ एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. याची प्राथमिक फेरी दिनांक २४ ऑगस्ट वार रविवार रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत होणार असल्याची माहिती लातूर नाट्य परिषद महानगर शाखेचे अध्यक्ष ऍड शैलेश गोजमगुंडे यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

या स्पर्धेत लातूर मधून १२ संघ सहभागी होत असून यात शहरातील ११२ तरुण व अनुभवी कलाकार, तंत्रज्ञ सहभागी होत आहेत. ही स्पर्धा दर वर्षी होणार असून त्याचे प्राथमिक फेरीचे केंद्र लातूर असणार आहे. तर अंतिम फेरी मुंबई येथे होणार आहे. लातूर केंद्रावरून प्रथम येणारी एकांकिका अंतिम फेरीस पात्र ठरणार आहे. पात्र एकांकिकेतील कलाकारांना मुंबईत सादरीकरणसोबतच दिग्गज मान्यवरांच्या मार्गदर्शनात नाट्यप्रशिक्षण दिले जाणार आहे. याशिवाय सहभागी प्रत्येक संघास प्रत्येकी रु. २००० निर्मिती खर्च दिला जाणार आहे.

अंतिम फेरीत भरघोस बक्षिसे असलेल्या या स्पर्धेत लातूरतील तालीम स्वरूपात होणाऱ्या प्राथमिक फेरीत ड्रायव्हर (राजर्षी शाहू मह.), दि फिअर फॅक्टर,(फ्रिलान्सर), दि रिंग अगेन (सूर्योदय सांस्कृतिक कलामंच) अध्याय पाचवा (कलारंग सांस्कृतिक संस्था), गांधी कधी येणार (नाट्यनिकेतन), आंबेडकरीजम (लक्ष्मीनामा फाउंडेशन) यथार्थ (कलोपासक मंडळ ), येडी बाभळ (कॉकसिट महा.), जाहला सोहळा अनुपम (जयक्रांती अध्यापक महा.), लेकरू (मानवता बहु. सेवा. संस्था), बट बिफोर लिव्ह (शाहू महा. अटोनॉमस) मैं वारी जावा (रसबहार कलामंच) आदी एकांकिका सादर होणार आहेत.

या महोत्सवास लातूरकर रसिकांनी आवर्जून उपस्थित रहावे, नाट्यास्वाद घ्यावा व कलावंतांचा उत्साह वाढवावा असे आवाहन स्पर्धा केंद्रप्रमुख ऍड शैलेश गोजमगुंडे, स्पर्धा समन्वयक डॉ. मुकुंद भिसे व प्रा. डॉ. दिपक वेदपाठक, प्रदीप पाटील खंडापूरकर, धनंजय बेंबडे, अनील पुरी, यांनी केले आहे.



**बैलपोळ्याचा दिवस हा शेतकऱ्यांनी बैलांविषयी असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. भोकर तहसील कार्यालयाचे तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी बैलपोळा निमित्त तहसील कार्यालयाच्या प्रांगणात बैलांचे ढोल ताशांच्या गजरात स्वागत व पूजा करून बैलांविषयी असलेली आपली कर्तज्ञता व्यक्त केली. यावेळी नायब तहसीलदार उमर शेख, वरिष्ठ लिपिक चौधरी, शेळके, मंडळ अधिकारी मनोज कुमार खंदारे , ग्राम महसूल अधिकारी अनिल मुनेश्र्वर आदींसह कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते. (छाया – सिद्धार्थ जाधव, भोकर)**

# ’’जिथे मुलींचा आवाज ऐकला जातो, तिथूनच खऱ्या बदलाची सुरुवात होते’’ उपक्रमाचा उगम – युवराज पाटील

ग्रामीण भागातील मुलींच्या समस्या अनेकदा घरात, समाजात किंवा ग्रामपंचायतीच्या सभेत हरवून जातात. त्यांच्या अडचणी कोणी मांडतच नाहीत; आणि मांडल्या तरी त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर ’’बालिका स्नेही पंचायत’’ ही संकल्पना जन्माला आली.

नांदेड जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करत असताना श्रीमती मिनल करनवाल यांनी या उपक्रमाला सुरुवात केली. त्यांनी पाहिले की मुलींना शाळा, आरोग्य, स्वच्छता, सुरक्षितता अशा अनेक मूलभूत बाबींमध्ये अडचणी आहेत; पण त्या मांडण्यासाठी कुठेही योग्य व्यासपीठ नाही. म्हणूनच ग्रामपंचायतीच्या अधिकृत सभेत मुलींनाही बोलण्याची संधी मिळावी, त्यांचे प्रश्न थेट लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचावेत, यासाठी या अभिनव उपक्रमाचा प्रारंभ झाला.

– जळगाव जिल्ह्यातील सुरुवात

जळगाव जिल्ह्यात ’’बालिका स्नेही पंचायत’’ या उपक्रमाला नवी गती मिळाली. कानळदा गावात झालेल्या पहिल्या बालिका स्नेही ग्रामसभेत मुलींनी निर्भीडपणे आपले प्रश्न मांडले. त्यांनी सांगितले शाळेत पाणी व स्वच्छतागृह नाही, खेळण्यासाठी जागा नाही, गावात कचरा साचतो, काही अनधिकृत व्यवसायांमुळे मुलींच्या सुरक्षिततेवर परिणाम होतो, महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक प्रसाधनगृह नाही, आणि अजूनही बालविवाहाचा धोका कायम आहे.

ग्रामपंचायतीने याची दखल घेत तातडीने उपाययोजना सुरू केली. शाळेतील सुविधा सुधारल्या, स्वच्छता उपक्रम राबवले, महिलांसाठी प्रसाधनगृहे उभारली. परिणामी गावात सकारात्मक बदल दिसू लागला आणि इतर गावांनीही या उपक्रमाशी जोडले जाण्याचा निर्णय घेतला.

– मुलींचा आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण

’’बालिका स्नेही पंचायत’’ ही केवळ समस्यांचे निराकरण करणारी योजना नाही, तर मुलींच्या आत्मविश्वासाला नवे पंख देणारी शाळा आहे. या व्यासपीठामुळे मुली स्वतःचा आवाज बुलंद करू लागल्या, आपले अधिकार ओळखू लागल्या, नेतृत्वगुण विकसित करून निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ लागल्या.

आतापर्यंत ग्रामसभेत केवळ पुरुष आणि लोकप्रतिनिधींचा आवाज घुमायचा; पण आता या पंचायतांमध्ये मुलींचाही ठसा उमटू लागला आहे.

– बदलाची बीजे

’’बालिका स्नेही पंचायत’’ म्हणजे ग्रामीण समाजात नवा संवाद सुरू होण्याचा क्षण. मुली थेट प्रश्न मांडतात, त्यामुळे ग्रामपंचायतीवर तातडीने कृती करण्याची जबाबदारी येते. हा संवाद फक्त समस्या सांगण्यापुरता मर्यादित राहत नाही, तर मुलींमध्ये आवाज उठवण्याची संस्कृती रुजवतो. या प्रक्रियेतून मुलींच्या मनात बदल, उद्याच्या समाजात परिवर्तन आणि पुढील पिढ्यांमध्ये आत्मनिर्भरतेची बीजं रोवली जात आहेत.

– भविष्याचा मार्ग

या उपक्रमाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ग्रामीण भागातील मुलींमध्ये आत्मविश्वास वाढला आहे. आजची छोटी मुलगी उद्या जबाबदार नागरिक, सक्षम स्त्री आणि कदाचित गावाच्या नेतृत्वात सक्रिय भूमिका बजावणारी व्यक्ती होईल. या उपक्रमाने दाखवून दिले आहे की सामाजिक बदलाची सुरुवात एका संवेदनशील संकल्पनेतूनही होऊ शकते.

– एका दूरदृष्टीची कहाणी

श्रीमती मिनल करनवाल यांच्या दूरदृष्टीतून रुजलेली ही संकल्पना आज महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये प्रेरणादायी ठरत आहे. जळगाव जिल्ह्यातील यश पाहता हा उपक्रम इतरत्रही वेगाने पसरतो आहे. हा प्रवास केवळ पंचायत पातळीवरच्या कामांचा नाही, तर ग्रामीण समाजरचनेत मुलींच्या अधिकारांना स्थान देणाऱ्या एका नव्या सामाजिक क्रांतीचा प्रवास आहे. म्हणूनच, ’’बालिका स्नेही पंचायत’’ ही केवळ एक योजना नाही, तर मुलींच्या स्वप्नांना नवे पंख देणारा, त्यांचा आवाज बुलंद करणारा आणि उद्याच्या भारताला नवी दिशा देणारा सामाजिक परिवर्तनाचा दीपस्तंभ ठरत आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने, विविध मागण्याचे लातूर महानगरपालिकेला निवेदन देण्यात आले.

लातूर : वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विविध मागण्याचे निवेदन लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यांना देण्यात आले. महानगरपालिका प्रशासनाने स्वतःच्या हद्दीमध्ये कत्तलखाना बांधणे. २० ते २७ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर केलेली मांस विक्री बंदी मागे घ्यावी. महानगरपालिका प्रशासनाने बंद पडलेला कोंडवाडा चालू करणे. यासाठी निवेदन देण्यात आले.



मा. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार या देशांमध्ये सर्वांना स्वतःच्या मर्जीनुसार पौष्टिक आणि गरजेचं अन्न खाण्याचा अधिकार आहे. त्यानुसार कृषी समाजाच्या व्यवसायातील संबंधित असलेला कत्तलखाना हा ज्या त्या नगरपरिषद महानगरपालिकेने स्वतः तयार करणे आवश्यक आहे त्यानुसार आपण आपल्या हद्दी मध्ये स्वतः चा कत्तलखाना ची उभारणी करावी.

२० ते २७ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर केलेली मांस विक्री बंदी मागे घ्यावी. आपल्या लातूर शहरांमध्ये औद्योगिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून कोणतीही उपलब्धता नाही त्यातच आपण राजकीय आणि धार्मिक या गुंतागुंतीमध्ये न अडकता आपण प्रशासक म्हणून कार्य करावे आणि आपल्या माध्यमातून जाहीर केलेली मांस विक्री बंदी मागे घ्यावी.

वर्षानुवर्ष लातूर शहरांमध्ये डीसीसी बँकेच्या पाठीमागे शहरातील फिरती जनावरांना ठेवण्यासाठी कोंडवाडा उपलब्ध होता पण महानगरपालिका प्रशासनाने जाणून-बुजून बंद केलेला तो कोंडवाडा पूर्वत चालू करावा.

जेणेकरून शहरांमध्ये जो काही जातीय ताण-तणाव गोवंश व गोरक्षण नावाखाली होत आहे त्यामधून जनावरे हे आपल्या कोंडवड्यात ठेवता येतील व शासन आणि प्रशासनाच्या निगराणीखाली पुढील कारवाई होत राहील.

वरील मागण्याचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून देण्यात येत आहे यावर त्वरित निर्णय द्यावा असे ही नाहीतर पुढील होणाऱ्या आंदोलन व विरोधाला प्रशासन जबाबदार असेल.

यावेळी वंचित बहुजन आघाडी लातूर जिल्हा उपाध्यक्ष खलील शेख भाई,शहर अध्यक्ष इंजि.सचिन अर्जुन गायकवाड , शहर महासचिव आकाश इंगळे भैया, महिला शहराध्यक्ष सुजाता अजनीकर ताई, शहर सचिव शरीफ पठाण भाई, कुरेशी समाज प्रतिनिधी ,पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भारतीय सैन्याचा अपमान केल्याबद्दल राऊत यांनी माफी मागावी

मुंबई : उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांशी संवाद साधण्याची जबाबदारी भारतीय जनता पार्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सोपवली आहे. त्यानुसार श्री. फडणवीस यांनी विरोधी नेत्यांशी संवाद साधला. फडणवीस यांच्या चाणक्यनीतीचा पूर्वानुभव असल्याने औरंगजेब फॅन क्लबचे प्रवक्ते संजय राऊत यांच्या पायाखालची जमीन सध्या सरकली आहे, अशा शब्दात भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी राऊत यांच्यावर टीकास्त्र सोडले. भाजपा प्रदेश कार्यालयात शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हत्याकांडातील अतिरेक्यांना भारतीय सैन्याने ठार करूनही पाकिस्तानचे प्रवक्ते असल्याप्रमाणे श्री. राऊत हे अतिरेकी जिवंत असल्याचा दावा करून भारतीय सैन्याच्या शौर्याचा अपमान करतात त्याबद्दल त्यांनी समस्त भारतीयांची माफी मागावी अशी मागणीही त्यांनी केली.



यावेळी श्री. बन म्हणाले की, उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विविध पक्षांशी संपर्क साधण्याची जबाबदारी असलेल्या श्री. फडणवीस यांनी ’’मविआ’’च्या नेत्यांशी संपर्क साधल्याने राऊतांची चिडचिड झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चाणाक्यनीतीचा साक्षात्कार तीन वर्षांपूर्वी राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकीत दिसला आहे, म्हणूनच डोके ठिकाणावर नसलेल्या राऊतांनी बेताल बडबड चालू केली आहे. महाराष्ट्राचे पहिले नागरिक असलेल्या राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना सौजन्य दाखवून पाठिंबा द्यायला हवा होता, मात्र संजय राऊत ते करणार नाहीत. मविआचा पत्त्यांचा बंगला कोसळणार असून उरलेसुरले तुमचे खासदार तुमच्या सोबत राहतात का, हे आधी बघा. असा टोलाही त्यांनी श्री. राऊत यांना लगावला.

जावेद मियांदादला बिर्याणी खाऊ घालणाऱ्यांनी भाजपाला राष्ट्रवाद शिकवू नये भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्याबाबत भारताची स्पष्ट भूमिका आहे. ना पाकिस्तानचे खेळाडू भारतात येणार, ना भारत पाकिस्तानात जाणार. करार आणि आशिया कप स्पर्धेचे स्वरूप वेगळे असले तरी राष्ट्रवाद काय असतो हे संजय राऊत यांनी शिकवू नये अशी बोचरी टीका श्री. बन यांनी केली.

रोहित पवार यांनी मुख्यमंत्र्यांवर केलेल्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर देत श्री. बन म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हे बहुजन समाजाचे नेते आहेत. १८ पगड जातींना सोबत घेऊन जाण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. एका वर्तमानपत्राने तद्दन खोटी बातमी दिली आहे. सर्वच महामंडळांना समान वागणूक आणि निधी देण्याचे काम महायुती सरकार करत आहे. आमचे काम सबका साथ, सबका विकास या तत्वावर आधारित आहे. तरीसुद्धा रोहित पवार जाणीवपूर्वक खोटी टीका करत असल्याचेही ते म्हणाले.

## करचुकवेगिरी प्रकरणात दोन जणांना अटक ३० कोटी ५२ लाख रुपयांची फसवणूक

मुंबई, : महाराष्ट्र जीएसटी विभागाने देवरा एक्झिम एलएलपी या फर्मचे भागीदार मेहुल जैन व ऑपरेटर कमलेश जैन यांना ३० कोटी ५२ लाख रुपयांच्या करचुकवेगिरी प्रकरणात अटक केली. आरोपींनी चुकीची इनपुट टॅक्स क्रेडिट (खढउ) वजावट घेतल्यामुळे शासनाची महसूल हानी झाली. न्यायालयाने त्यांना ४ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. कारवाईदरम्यान व्यापाऱ्याने चुकीची इनपुट टॅक्स क्रेडिट वजावट केल्यामुळे शासनाची महसूल हानी झाल्याचे आढळून आले. राज्यकर सहआयुक्त संजय पवार आणि उपायुक्त स्वप्नाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सतीश पाटील, शरदचंद्र पोहनकर, भूपेन्द्र वळवी, मनोहर कनकदंडे यांनी ही कारवाई केली. संबंधित आरोपी करदात्याची कृती महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ व संबंधित नियमांचे सरळ उल्लंघन आहे. अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी, मुंबई यांनी आरोपींना ०४ सप्टेंबर २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभाग आधुनिक नेटवर्क विश्लेषण साधनांचा वापर करून व इतर शासकीय विभागांशी समन्वय साधून कर चुकवेगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर सतत लक्ष ठेवत आहे.

# राशीभविष्य २३ ऑगस्ट २०२५

मेष: शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पूर्व
व्यवसायात अनकुल असे यश मिळेल. कौटुंबामध्ये सुख व शांतीचे वातावरण लाभेल. कोणावरही अंध विश्वास बाळगू नका.

वृषभ : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम
प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो. व्यापारात नवीन प्रस्ताव येतील. मुलांच्या कामाकडे लक्ष राहू द्या. सुखकारक प्रवास घडेल.

मिथुन शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पश्चिम
मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल. आखलेल्या योजना पूर्ण होणार नाही. प्रवास त्रासदायक राहील.

कर्क :शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर
आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याचे योग आहेत. प्रतिष्ठीत व्यक्तिशी संबंध वाढतील. मुलांची प्रगती राहील. जोखमीचे कामे आज करू नका.

सिंह : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. फायदेशीर व्यवहार राहतील. कौटुंबिक वातावरण चांगले राहिल. समाजात प्रतीष्ठा वाढेल. मशीन वहान सावधपूर्वक हाताळा.

कन्या :शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पश्चिम
विरोधकांवर मात केल्यामुळे आपल्या किर्तीत वाढ होईल. व्यापाराचे क्षेत्र विस्तृत होईल. जीवन साथीशी चांगले संबंध राहतील. आरोग्याची काळजी घ्या.

तुळ: शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पश्चिम
आपल्या आपक्षेप्रमाणे फळ मिळणार आहे. चैनीच्या वस्तू खरेदी करण्याचा योग आहे.जवळच्या व्यक्तीच्या आरोग्याची काळजी राहील

वृश्चिक: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल. आखलेल्या योजना पूर्ण होणार नाही. प्रवास त्रासदायक राहील.

धनु: शुभ रंग:काळा, शुभ दिशा : उत्तर
कोणत्यातरी कामात मिळालेले यश आपल्यास फायदेशीर राहणार आहे. घराची अडचण दूर होईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. रागावर नियंत्रण हवे.

मकर :शुभ रंग: गुलाबी, शुभ रंग: पूर्व
योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे परंतु त्याच प्रमाणे उत्पन्न राहील. प्रत्येक्ष क्षेत्रात मान सन्मान मिळेल. कोणतेही काम जबाबदारीने करा.

कुंभ: शुभ रंग: लाल, शुभ रंग: पूर्व
योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे परंतु त्याच प्रमाणे उत्पन्न राहील. प्रत्येक्ष क्षेत्रात मान सन्मान मिळेल. कोणतेही काम जबाबदारीने करा.

मीन :शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो. व्यापारात नवीन प्रस्ताव येतील. मुलांच्या कामाकडे लक्ष राहू द्या. सुखकारक प्रवास घडेल.

# इतिहासात आजचा दिवस २३ ऑगस्ट २०२५

अंतरराष्ट्रीय

१८३३ – थिओडोर ली मान यांनी प्राणिसंग्रहालयशास्त्राचा ओनामा केला.

१८५८ – न्यूयॉर्कच्या एका हॉटेलात पहिली लिफ्ट बसवली गेली.

१९३९ – रिबेन ट्रॉप- मोलोटोव्ह करार. रशिया आणि जर्मनीने एकमेकांवर आक्रमण करायचे नाही आणि पोलंडचा भूभाग वाटून घ्यायचा, असे या करारान्वये ठरले, यामुळे इंग्लंड आणि फ्रान्स यांना हादरा बसला.

१९४० – लंडनवर प्रथमच प्रचंड बॉम्बवर्षाव- याला ब्लिट्झचा तडाखा, असे वृत्तपत्रांनी म्हटले.

२००८ – अर्जेंटिनाने नायजेरियाला हरवून फुटबॉलमध्ये सलग दुसऱ्या ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक मिळवले.

राष्ट्रीय

१६३२ – विजापूरच्या आदिलशहाचा वजीर मुरार जगदेव याने परिंडा किल्ल्यावर मोगलांच्या ताब्यात असलेली मुलुक ए-मैदान तोफ विजापूर येथे आणली.

१९३३ – प्रकृती चिंताजनक वाटल्याने ब्रिटिश सरकारने महात्मा गांधींची तुरुंगातून सुटका केली.

१९५८ – पंडित जवाहरलाल नेहरू यांनी औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाचे उद्घाटन केले.

२००६ – अहमदाबाद-राजकोट राष्ट्रीय महामार्गावर बावलाजवळ एक ट्रक उलटून १९ जण ठार झाले.

२००६ – जम्मू-काश्मिरमध्ये राजौरीहून परौरीला जात असलेली भाविकांची एक खाजगी बस दरीत कोसळल्याने १५ जणांचा मृत्यू झाला.

२००६ – भिवंडी दंगलीचा मुख्य सूत्रधार परवेझ मोमीनला भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सोलापुरात अटक केली.

२००८ – औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पन्नासावा वर्धापनदिन साजरा झाला.

जन्म

१७६८ – सर ॲस्टली पॅस्टन कूपर, ब्रिटिश शल्यशास्त्रज्ञ.

१९१२ – जॉन केली, अमेरिकन अभिनेता आणि नर्तक.

१९१८ – विंदा करंदीकर ऊर्फ गोविंद विनायक करंदीकर, मराठीतील प्रसिद्ध कवी व समीक्षक.

१९२३ – डॉ.व. दि. कुलकर्णी, मराठीतील सुप्रसिद्ध समीक्षक व संत साहित्याचे अभ्यासक.

१९२३ – बलराम जाखड, लोकसभेचे माजी सभापती.

निधन

१९७१ – हंसा वाडकर, ’सांगत्ये ऐका’च्या लेखिका.

१९७५ – विनायकबुवा पटवर्धन, सुप्रसिद्ध गायक.

## गोसावी प्रतिष्ठानच्या मेळाव्यास उपस्थित राहावे:अनिल पुरी

लातूर – गोसावी समाज प्रतिष्ठान लातूर आयोजित त्रिसुत्री कार्यक्रम दिनांक २३ ऑगस्ट वार शनिवार रोजी सकाळी दहा वाजता भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.या सोहळ्यासाठी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहान प्रतिष्ठानचे प्रमुख अनिल पुरी यांनी केले आहे. प्रतिष्ठानच्या वतीने गेली अठावीस वर्षा पासून विविध सामाजिक उपक्रम घेतले जातात.याचाच एक भाग म्हणून समाजात उल्लेखनीय काम करणाऱ्या समाज बांधवांना विविध पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते यावेळी सन्मानित केले जाणार आहे. इयत्ता दहावी व बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव ही केला जाणार आहे.तसेच महाराष्ट्रातील विविध निमंत्रीत मान्यवरांचे मार्गदर्शन याप्रसंगी होणार आहे.तरी या भव्य-दिव्य सामाजिक कार्यक्रमाला जास्तीतजास्त गोसावी समाज बांधवानी उपस्थित राहाण्याचे आवाहान गोसावी समाज प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894